# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक २०१ वा गुरूवार दि.३० जानेवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# महाकुंभमेळा चेंगराचेंगरीत ३० जणाचा मृत्यू, १९ जखमी

मौनी अमावस्येला आज सकाळी झालेल्या महाकुंभात झालेल्या चेंगराचेंगरीबाबत उत्तर प्रदेश सरकारचे पहिले अधिकृत विधान आले आहे. पोलिस डीआयजी वैभव कृष्णा यांनी दिलेल्या माहितीनुसार, या चेंगराचेंगरीत आतापर्यंत ३० जणांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, १९ जखमी रुग्णालयात दाखल आहेत.

ते म्हणाले की, मृत्यू झालेल्यांमध्ये २५ लोकांची ओळख पटली आहे, गुजरात, कर्नाटक आणि इतर राज्यांतील लोकांचा मृत्यूच्या संख्येत समावेश आहे. अपघातानंतर एकूण ९० जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, त्यापैकी सध्या गंभीर जखमी असलेले १९ जण दाखल आहेत, उर्वरित सर्वांना प्राथमिक उपचारानंतर रुग्णालयातून घरी सोडण्यात आले आहे.



पोलिस डीआयजीच्या म्हणण्यानुसार, मंगळवारी पहाटे दीड वाजता घाटावर मोठी गर्दी झाली होती. यावेळी गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी बॅरिकेडिंग करण्यात आले. तर ब्रह्म मुहूर्तावर आंघोळ करण्यासाठी गर्दीत स्पर्धा लागली आणि लोकांनी बॅरिकेड तोडून इकडे तिकडे धाव घेतली. त्यामुळे घटनास्थळी गोंधळाचे वातावरण निर्माण झाले, घाटाच्या आजूबाजूला झोपलेल्या लोकांना चिरडून लोक पुढे सरकू लागले.

पोलिसांनी सांगितले की, सध्या येथील परिस्थिती नियंत्रणात आहे. आज संध्याकाळपर्यंत ५ कोटींहून अधिक लोकांनी अमृत स्नान केल्याचे सांगण्यात येत आहे. याशिवाय १३ जानेवारीपासून आतापर्यंत सुमारे २५ कोटी लोकांनी महाकुंभात श्रद्धेने स्नान केले आहे.

# विद्यार्थ्यांनी नंदादीप सारखे ज्ञानाचा प्रकाश देणारे दीप बनले पाहिजे : पोलीस निरीक्षक सुधाकर देडे

लातूर :- प्रत्येक विद्यार्थ्यांनी दिव्याप्रमाणे तेवत राहून ज्ञानाचा प्रकाश देणारे नंदादीप बनले पाहिजे असे एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांनी साने गुरुजी शैक्षणिक संकुलातील नंदादीप माध्यमिक विद्यालय व साने गुरुजी बाल विकास केंद्राच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना केले. पुढे बोलताना ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपला अभ्यास करून शैक्षणिक गुणवत्ता वाढवताना मोबाईल सारख्या आधुनिक साधनांचा मर्यादित वापर केला पाहिजे जेणे करून पारंपारिक व आधुनिक साधनांची जोड मिळेल.



नंदादीप माध्यमिक विद्यालयाच्या परिसरातील स्व. श्यामराव (दादा ) माने खुल्या सभागृहात आयोजीत करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी जी.टी. माने तर प्रमुख पाहुणे दामिनी पथकाच्या प्रमुख पवार एम. एल., संस्था सचिव कालिदासजी माने, संस्था संचालिका सुरेखाताई माने, प्राथमिक विभागाच्या प्रशासकीय अधिकारी उषा आडे, नंदादीप माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीनिवास राऊत तथा साने गुरुजी बाल विकास केंद्राच्या प्रमुख भगत वर्षा उपस्थीत होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी साने गुरुजी शैक्षणिक संकुलातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन गणेश परळे व मिनाक्षी यादव यांनी केले तर आभार मुख्याध्यापक श्रीनिवास राऊत यांनी मानले.

# निद्रिस्त प्रशासनाला पंधरा दिवसानंतर आली जाग. अखेर त्या मोकाट कुत्र्यांची उचलबांगडी.

चाकूर: शहरात मोकाट कुत्र्यांनी दहशत माजवली आहे. १५ दिवसापासून पिसाळलेली कुत्रे अनेकांचा चावा घेत आहेत . शालेय विद्यार्थ्यांना शाळेत पाठवण्यासाठी पालकांत भीतीचे वातावर निर्माण झाले आहे. कुत्र्यांनी चावा घेतल्याची माहिती नगरपंचायत प्रशासनाला असतानाही मागील काही दिवसापासून त्याकडे डोळे झाक केले. अखेर नगरपंचायतच्या सभापतीलाच निवेदन द्यावे लागले अन् बुधवारी त्या कुत्र्यांची उचलबांगडी करण्यात आली.



१५ जानेवारीपासून या मोकाट कुत्र्यांनी लहान बालके,वृध्द व्यक्ती, गुरे ढोरे यांचा चावा घेतला आहे. यात शहरातील माळी गल्ली पासून इंदिरा नगर, सिद्धार्थ नगर भागातील ४० नागरिकांचा व १४/१५ गुरांचा चावा घेतल्याची अधिकृत माहिती आहे. एका पिसाळलेल्या कुत्र्याला नागरिकांनी मारले देखील. वरातीमागून घोडे मिरवणाऱ्या प्रशासनाने मात्र पाळीव कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याचे सोडून लसीकरण करण्याचा सल्ला दिला. सोमवारी काही नागरिकांना पुन्हा चावा घेतल्याने मात्र नगर पंचायतीच्या सभापतीने अखेर त्या कुत्र्यांचा बंदोबस्त करा अन्यथा ४ फेब्रुवारी रोजी आंदोलनं करू असा इशारा दिला. या इशाऱ्याने तब्बल १५ दिवसानंतर नगरपंचायतीच्या प्रशासनाला जाग आली आणि बुधवारी शहरातील पिसाळलेल्या कुत्र्यांची उचलबांगडी करण्यात आली. १५ दिवसानंतर जागे झालेल्या प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर मात्र सर्वत्र उलट सुलट चर्चा होताना दिसून येत आहे.

# 'लातूर ग्रामीण'चे माजी आमदार धिरज देशमुख यांनी केले कातळे कुटुंबियांचे सांत्वन



लातूर / प्रतिनिधी लातूर जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य प्रा. अर्चनाताई कातळे यांचे वडिल, रेणापूर सेवा सहकारी सोसायटीचे माजी चेअरमन रंगनाथराव कातळे यांचे नुकतेच निधन झाले. आज त्यांच्या रेणापूर येथील निवासस्थानी 'लातूर ग्रामीण'चे माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन धिरज विलासराव देशमुख यांनी भेट देऊन कातळे कुटुंबियांचे सांत्वन केले. रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, रेणापूर बाजार समितीचे सभापती उमाकांत खलंग्रे, लातूर जिल्हा बँकेचे संचालक अनुप शेळके, रेणापूर बाजार समितीचे उपसभापती शेषराव हाके पाटील, रेणापूर सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन देविदास कातळे, पदम पाटील, विश्वनाथ कागले, सचिन मोटेगावकर, राजाभाऊ साळुंके, प्रकाश सूर्यवंशी, प्रवीण माने, चंद्रकांत कातळे, अतुल कातळे, शहाजी कातळे आदीसह कातळे कुटुंबिय यावेळी उपस्थित होते.

# पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचा लातूर जिल्हा दौरा

लातूर : - राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले हे ३० व ३१ जानेवारी २०२५ रोजी दोन दिवसांच्या लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. पालकमंत्री ना. भोसले यांचे ३० जानेवारी रोजी सकाळी लातूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल व राखीव. सकाळी ११.५५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथील जनसंपर्क कक्ष व संविधान उद्देशिका प्रतिकृतीचे त्यांच्या उपस्थितीत उद्घाटन होईल. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात दुपारी १२ वाजता आयोजित लातूर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीला ते उपस्थित राहतील. दुपारी २ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे राखीव. दुपारी ३.३० वाजता हरंगुळ बु. येथील संवेदना प्रकल्प येथे 'प्रधानमंत्री दिव्याशा केंद्र' उद्घाटन समारंभाला ते उपस्थित राहतील. त्यानंतर सोयीनुसार त्यांचे शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल व राखीव. सायंकाळी ७.१५ वाजता ग्रामदैवत श्री सिध्देश्वर मंदिर येथे त्यांचे आगमन होईल व दर्शन घेतील. सोयीनुसार लातूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल व मुक्काम करतील.



३१ जानेवारी रोजी सकाळी १०.१५ वाजता लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय येथे 'भरोसा सेल' इमारतीचे लोकार्पण पालकमंत्री ना. भोसले यांच्या हस्ते होईल. जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी १०.४० वाजता आयोजित विविध जिल्हास्तरीय समित्यांच्या बैठकीला ते उपस्थित राहतील. सकाळी ११.४५ वाजता त्याचे शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल व राखीव. दुपारी २.४० वाजता लातूर विमानतळ येथून हेलिकॉप्टरने पुणेकडे प्रयाण करतील.

# उदगीरला अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करावे

**महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांची मागणी**

उदगीर : तीन राज्याच्या सीमेवर असलेले उदगीर शहर हे एक ऐतिहासिक शहर असून येथील बाजारपेठ मोठी असल्याने व्यापाऱ्यांची संख्या मोठी आहे. उदगीर शहरालगत दोन-तीन तालुके असून दिवसेंदिवस महसूल विभागाची कामे वाढत आहेत व यासाठी उदगीर ते लातूर हे जवळपास ७० किलोमीटरचे अंतर पार करून लातूरला जावे लागत आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांची गैरसोय होत आहे. याकरिता उदगीरला अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय स्थापण करावे अशी मागणी राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे माजी मंत्री तथा उदगीरचे आमदार संजय बनसोडे यांनी केली आहे. उदगीर शहरात मागील काळात विविध शासकीय इमारती बांधून तयार केल्या आहेत. सद्या जिल्हास्तरीय न्यायालय, आर. टी. ओ. कार्यालय वेगवेगळ्या प्रकारची अनेक जिल्हास्तरीय कार्यालये आहेत. तसेच जिल्ह्यातील सर्वात मोठे शहर असल्याने येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी होणे अत्यंत गरजेचे आहे. जेणेकरुन मतदारसंघातील जनतेचा वेळ व पैसा वाचेल व अधिक जलदगतीने कामे होण्यास मदत होईल म्हणून सदर कार्यालय लवकरात लवकर उदगीरला



करावे. अशी लेखी मागणी आमदार संजय बनसोडे यांनी केली आहे. त्यांच्या मागणीला महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

# जिल्ह्यातील सोयाबीन खरेदीचे उद्दिष्ट वाढवून खरेदीची मुदत वाढवावी आ. कराड यांची मागणी

लातूर : - शेतकऱ्यांना दिलासा देता यावा यासाठी हंगाम २०२४२५ करिता केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत नाफेड तर्फे चार एजन्सी मार्फत लातूर जिल्ह्यात सोयाबीन खरेदीचे काम सुरू झाले. आतापर्यंत १२ लाख ८४ हजार सोयाबीन ची खरेदी झाली असून ६३ हजार शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी करणे बाकी आहे बहुतांशी शेतकऱ्यांचे सोयाबीन घरीच असल्याने दहा लाख क्विंटल सोयाबीन खरेदीचे उद्दिष्ट वाढवून सोयाबीन खरेदीची मुदत वाढवून द्यावी अशी मागणी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि राज्याचे पणन मंत्री जयकुमारजी रावल यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.



लातूर जिल्हा सोयाबीन उत्पादक जिल्हा असून जिल्ह्यातील बहुतांशी शेतकरी सोयाबीनचे पीक मोठ्या प्रमाणात घेतात या सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देता यावा याकरिता राज्यातील महायुती शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत नाफेड मार्फत सोयाबीन खरेदीचे काम सुरू केले आतापर्यंत जिल्ह्यातील १ लाख १५ हजार शेतकऱ्यांनी सोयाबीन खरेदीसाठी नोंदणी केली असून त्यापैकी ५२ हजार शेतकऱ्यांचे १२ लाख ८४ हजार १७२ क्विंटल सोयाबीनची खरेदी झालेली आहे नोंदणी झालेल्या ६३ हजार २९१ शेतकऱ्याची सोयाबीन खरेदी होणे बाकी असून खरेदीची मुदत ३१ जानेवारी २०२५ पर्यंतच आहे असे दिलेल्या निवेदनात नमूद करून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, बहुतांशी शेतकऱ्याचे सोयाबीन मोठ्या प्रमाणात शिल्लक असल्याने लातूर जिल्ह्यातील सोयाबीन खरेदी योजनेचे उद्दिष्ट वाढवण्याबरोबरच खरेदी योजनेला मुदतवाढ देणे गरजेचे आहे.

यावर्षी लातूर जिल्ह्यात अंदाजे ९९ लाख क्विंटल इतके सोयाबीन उत्पादित झाले असून आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत यापैकी २५ टक्के म्हणजे २५ लाख क्विंटल सोयाबीन खरेदी करणे आवश्यक आहे. त्यानुसार आत्तापर्यंत १२ लाख ८४ हजार क्विंटल सोयाबीनचे खरेदी झाली असून आणखी १२ लाख क्विंटल सोयाबीन खरेदी होणे आवश्यक आहे. लातूर जिल्ह्याला देण्यात आलेले उद्दिष्ट जवळपास पूर्ण झाले असून शेतकऱ्याकडे असलेले सोयाबीन लक्षात घेता नोंदणी केलेल्या सर्व शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी करण्यासाठी आणखी १० लाख क्विंटल सोयाबीन खरेदीला मान्यता आणि मुदतवाढ शासनाने देऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी ही मागणी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि राज्याचे पणन मंत्री जयकुमारजी रावल यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

## संपादकीय....

# ‘वक्फ’च्या सुधारणा

देशात सर्वांना समान वागणूक आणि संधी असेल, असे सूत्र भारतीय राज्यघटनेने आखून दिले आहे. समाजातील दलित, आदिवासी, भटके–विमुक्तांसाठी राखीव जागांचे धोरण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या घटनेनुसारच सुनिश्चित करण्यात आले आहे. तसेच धार्मिक पायावर आरक्षण नाही आणि कुठल्याही एका जात, पंथ वा धर्माला खास वागणूक न देता सर्वांना भारतीय म्हणून एकच दर्जा दिलेला आहे. मात्र स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेसने आपल्या धोरणात मतपेढी नजरेसमोर ठेवून अल्पसंख्याकांना झुकते माप दिले. वास्तविक या घटकाला शिक्षण व आरोग्याच्या सेवा–सुविधा देऊन सक्षम करण्याची गरज होती. वक्फ बोर्डांबाबत जाणीवपूर्वक नरमाईचे धोरण स्वीकारले गेले. डॉ. मनमोहन सिंग सरकारच्या काळात मुस्लिमांच्या मागासलेपणाचा अभ्यास करण्यासाठी न्या. सच्चर आयोग नेमण्यात आला. आयोगाने मुस्लिम समाजाची उन्नती व त्यांच्यात सुधारणा होण्यासाठी मूलभूत उपाय सुचवले. पण त्यांचीही अंमलबजावणी झाली नाही. २०१४ मध्ये सत्तेवर आलेल्या नरेंद्र मोदी सरकारने जम्मू–काश्मीरसाठीचे ३७० वे कलम रद्द करणे, तिहेरी तलाकची प्रथा रद्द करणे आणि उत्तराखंड या भाजपशासित राज्यात समान नागरी कायदा लागू करणे, ही त्याच दिशेने टाकलेली पावले होत.

यापुढे उत्तराखंडमध्ये विवाह, घटस्फोट आणि मालमत्तेबाबत सर्व नागरिकांना एकच नियम लागू झाला आहे. या राज्यात समान नागरी कायदा (यूसीसी) लागू करून भाजपने आणखी एक निवडणूक आश्वासन पूर्ण केले. अर्थात उत्तराखंडप्रमाणेच नजीकच्या भविष्यकाळात देशात सर्वत्र यूसीसीचे राज्य येईल, अशीच चिन्हे दिसत आहेत. या कायद्यामुळे उत्तराखंडमधील कोणत्याही धर्माच्या नागरिकांसाठी एकसारखे कायदे लागू राहणार आहेत. त्यामुळे कायदेशीर भेदभाव दूर होण्याची अपेक्षा आहे. कोणत्याही धर्म वा समाजाला लक्ष्य करण्यासाठी यूसीसीचा वापर होणार नाही, असे आश्वासन उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी दिले आहे. प्रार्थना किंवा धार्मिक प्रवचनांसाठी ध्वनिक्षेपकाचा वापर करणे, हा कोणत्याही एका धर्माचा अविभाज्य भाग नाही. त्यामुळे ध्वनिक्षेपकाच्या वापरासाठीची परवानगी नाकारली गेल्यास, हक्कांचे उल्लंघन केल्याचा दावा कोणीही करू शकत नाही. उलट परवानगी नाकारणे, हेच सार्वजनिक हिताचे असल्याची स्पष्टोक्ती मुंबई उच्च न्यायालयाने केली आहे. वर्षाचे ३६५ दिवस मशिदींवरील भोंग्यांमधून अजान पढणे वा समाजाला सूचना देणे, अशा गोष्टी घडत असतात. हिंदूंच्या सण–उत्सवांच्या वेळीही ध्वनिक्षेपकाचा त्रास असतो. मात्र धर्म कोणताही असो, हे ध्वनिप्रदूषण थांबवण्याचे कर्तव्य पोलिसांनी पार पाडावे, असे न्यायालयाचे म्हणणे. या सर्व पार्श्वभूमीवर आता केंद्रातील सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (रालोआ) सदस्यांनी मांडलेल्या १४ दुरुस्त्या मंजूर करून संयुक्त संसदीय समितीने (जेपीसी) सोमवारी वक्फ दुरुस्ती विधेयकास हिरवा कंदील दाखवला आहे.

देशात स्वातंत्र्यानंतर १९५४ मध्ये वक्फ कायदा लागू झाला. वक्फ बोर्डाची देशात किमान ८ लाख एकरांहून अधिक जमीन व अंदाजे सव्वा लाख कोटी रुपयांची मालमत्ता आहे. ही जमीन जगातील ५० लहान देशांच्या क्षेत्रफळाइतकी आहे. वक्फ बोर्ड कायद्याच्या कलम ४० अंतर्गत वक्फ मंडळाला ‘रिझन टू बिलीव्ह’चा अधिकार प्राप्त होतो. एखादी मालमत्ता वक्फ संपत्ती आहे, असे या मंडळाला वाटत असेल, तर ते स्वतः ती वक्फ संपत्ती असल्याचे घोषित करू शकते. त्याबाबत वक्फ न्यायाधिकरणाकडे आक्षेप नोंदवणे व नंतर उच्च न्यायालयात आव्हान देणे, ही प्रक्रिया खूप गंतागुंतीची आहे. सध्या देशातील वक्फ मंडळांना मालमत्तांमधून २०० कोटी रुपयांचा वार्षिक महसूल मिळतो. गेल्या ७५ वर्षांत या मंडळांकडे असलेल्या जमिनींची संख्या ३५ हजारवरून आता सुमारे १० लाख जमिनीच्या तुकड्यांवर जाऊन पोहोचली आहे. त्यातील अनेक जमिनी वक्फ मंडळांनी बळकावल्याचा दावा जेपीसीतील भाजप सदस्यांनी केला आहे. हा आरोप गंभीर असून म्हणूनच या जमिनींच्या मालकी हक्कांबाबत पूर्वलक्ष्यी प्रभावाने फेरआढावा घेतला पाहिजे, अशी मागणी आहे. विधेयकात या दुरुस्तीचा समावेश करण्यात आला, ते बरेच झाले. वक्फच्या जमिनी वा मशिदी ताब्यात घेतल्या जाणार नाहीत. मात्र दुरुस्तीचा कायदा लागू झाल्यानंतर सहा महिन्यांत या मंडळांच्या सर्व जमिनींची नोंदणी सरकारकडे करणे अनिवार्य असेल, अशी केली गेलेली तरतूद योग्यच आहे. ही पारदर्शकता असलीच पाहिजे.

दुरुस्त विधेयकात वक्फ मंडळावर दोन सरकारी अधिकार्यांची नियुक्ती करण्याची तरतूद आहे. हे अधिकारी हिंदू, मुस्लिम वा अन्य धर्माचे असू शकतात. त्याशिवाय बिगरमुस्लिम सदस्यांमध्ये दोन बिगरसरकारी सदस्यांचा समावेश केला जावा आणि हे सदस्य हिंदू वा इतर मुस्लिमेतर धर्मातील असतील, अशी सूचनाही करण्यात आली आहे. नव्या विधेयकात या शिफारशीचा समावेश झाल्यास वक्फ मंडळावर चार बिगरमुस्लिम सदस्य नियुक्त होऊ शकतील. मात्र या सदस्यांनी पूर्वग्रह न बाळगता न्यायबुद्धीने काम करावे, अशी अपेक्षा आहे. जेपीसीमध्ये विरोधकांनी ४४ अनुच्छेद फेटाळणार्या दुरुस्त्या मांडल्या. प्रत्येक दुरुस्तीवर मतविभागणी झाली. सत्ताधारी सदस्यांच्या १४ अनुच्छेदातील दुरुस्त्या १६ विरुद्ध १० मतांनी मंजूर झाल्या. मात्र जेपीसीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी विरोधकांचे म्हणणे ऐकून घेतले नाही, असा आरोप तृणमूल काँग्रेसचे सदस्य खासदार कल्याण बॅनर्जी यांनी केला. पण याच बॅनर्जी यांनी एका बैठकीत रागारागाने बाटली फोडली होती! वक्फ बोर्ड कुणाच्याही सांगण्यावरून वा आक्षेपावरून कुठलीही जमीन ताब्यात घेऊ शकतो, हा अधिकार काढून घेण्याची गरज होती. महाराष्ट्रात एका वादातील जमिनींवर क्लस्टर पद्धतीने विकास प्रकल्प राबवला जाणार होता. पण गुजरातमधील कोणीतरी आक्षेप घेतल्यावर ही जमीन वक्फची झाली! वक्फ मंडळाचा करभार पारदर्शक झाल्यास गरीब मुस्लिमांना शिक्षण, आरोग्यदायी सेवांचा लाभ होण्याची आशा आहे. वक्फच्या सुधारणा आणताना अल्पसंख्याकांना व्यापक आणि सर्वसमावेशक प्रमाणात त्याचा लाभ होण्याच्या दिशेने आता पाऊल टाकले पाहिजे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आज हयात असते तर.....!

डॉ.बाबासाहेब आंबेडकर आज हयात असते तर...! किंवा ते आज हयात असायला हवे होते. किंवा त्यांची समाजाला गरज आहें. किंवा ना झाला ना होणार कधी त्यांच्या सारखा. अशा प्रकारचे अनेक प्रश्न आपण ऐकतोय. पण मराठीत एक म्हण आहें,ऐकावे जणांचे पण करावें मनाचे. अन असं करतेवेळी ते पडते बामणांचे पथ्यावर! मूठभर बामण उगाच बसलाय का सिहासनावर! डॉ. आंबेडकर आज हयात नाहीत. हे सत्य कुणीही नाकारू शकत नाहीत. पण त्यांनी मूर्ख गुलाम आधी स्वतंत्र केला. यांना ि ल, ी ं, े लल ह्या प्रकारे सरकारी कार्यालयात नोंद करुन त्यांना सरकारी लाभ मिळावेत म्हणून लाभार्थी बनविले. त्यांना गुलामीतून मुक्त केले, मूर्ख न बनता / राहता त्यांना शहाणे केले. परंतु गाढवाला गुळाची चव काय ठाऊक. याप्रमाणे मुर्खाला गुळाची चव माहित नसते.मूर्ख तो मूर्खच. ज्यानं बुद्धधम्म स्वीकारला तो चातुर्वर्ण्या व्यवस्थेतून बाहेर पडला असा वर्ग अजूनही मूर्ख आहे. हे पाहून आज डॉ. बाबासाहेबांना काय वाटले असावे. आपणास याबद्दल काय वाटते. होय या प्रश्नाचे उत्तर आजपर्यँत कुणीच देईनासे झाले आहेत. देश आज प्रजासत्ताक होऊन पंच्याहत्तर वर्षे पूर्ण करीत आहे. तरीही समाज मूर्ख कसा आहे? समजा मोहल्यात बौध्दाच्या वस्तीत वेगवेगळ्या राजकीय पक्षाचे बॅनर असो की सामाजिक संघटन असो, ते पाहून मी चूक केली असं वाटण्यासारखं झालं असावं. कारण शिका, संघटित व्हा, संघर्ष करा ही तर माझीच शिकवण मी समाजाला दिलेय. त्याप्रमाणे तर समाज संघटित झालाय. गल्लीत संघटित होऊन दिल्लीत जाता येत नसेल तर असं संघटन उपयोगाचं नाही. त्याकरिता त्यांनी पक्ष बलवान होईल असं संघटन निर्माण करायला पाहिजे. ही उणीव भरून काढायला हवी. परंतु चातुर्वर्ण्यातील लाभार्थी सतत लाभ घेण्याचा विचार करतात. त्यांना मूर्ख – शहाणे होण्याची बात करायची नसते. त्यामुळे वर्ण व्यवस्था टिकून राहिलीय. धर्म एक आणि जाती अनेक, शिवाय त्या धंदेवाईक. त्यांच्या उद्योग धंद्याचं मोठमोठ्या भांडवलदारांनी कारखानदारीत रूपांतर करुन उद्योगपती झालेत त्या जातींचे झाले नाहीत. तर बुद्धीस्ट झाल्याने बौद्धानी स्वाभिमानी आयुष्य जगण्याची सुरुवात केली. ते आता पूर्वीसारखे देवाचा ध्यास करीत नाहीत पण धम्म आचरण करणारांचे प्रमाण नगण्यचं. बाबांनी स्वतःला प्रश्न विचारला असता की हे लोकं असे का वागतात. मी यांना सांगण्यास कुठे कमी पडलो? की माझी शिकवण समजण्यास हा समाज का कमी पडतो आहे. असे स्वतःला प्रश्न विचारले असते. परंतु आज त्यांत काही सुधारणा जरी केल्या तरी या समाजाने बाबासाहेबांचे ऐकले असते काय? कारण लाभ होय.हे लाभ लाभार्थ्यांना मिळतात म्हणून जाती टिकून आहेत, आणि जाती टिकून आहेत म्हणून जातीयता आहे. आणि जातीयता आहे म्हणून द्वेषा सारखा शत्रू माणसात दडून बसलाय.



शासनकर्ते जमात बनणारे जर शासनाचे झाले तर ते मूर्ख समाजाला मूर्खच ठेवतील. असेच यावरून दिसून येते. समाज शहाणा होईल असे कृत्य आहे तरी कुठे? बाप मेल्यावर आपली आई दुसरे लग्न करते का? काय तर म्हणे आम्हाला बाबासारखा नेता हवाय. अहो किती दिवस, किती वर्षे तेच ते तुणं तुणं ऐकत राहायचं? अहो बाबासाहेबांनी मौलिक विचार दिलेत ना. त्या पेक्षा काय हवंय? आज प्रत्यक्षात जरी ते अवंतरले तरी तुम्ही विश्वास तरी ठेवाल त्या आपल्या महामानववार.? अशक्य ते अशक्यच.

कुणीही टग्या उठतो आणि बाबासाहेबांना अपमानित करतो. मग काय विचारायची सोय नाही. काढा त्या विरोधात मोर्चे, करा आंदोलने. मग तरुण घालवून बसतात प्राण. जातं एखाद्या गरीबाचं लेकरू जीवाणीशी. म्हणतो तिलाच आम्ही चळवळ. डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रांती करुन गेले. इंग्रज शासक होता तो काळ आणि आज स्वातंत्र्य मिळालेले आम्ही क्रांती करु नये असं कुठे लिहिलंय काय? आपण क्रांती करावी. हे असे धोके चळवळ खपवून घेणार नाहीत. आणि जर का याउलट काही घडलं तर एकच मागणी स्वतंत्र मतदार संघाची जी बाबासाहेबांनी केली होती. ती पूर्ण करण्यासाठी लढावं लागेल. पूणे करारात जे झाले ते बाबासाहेबांना सोडून गेले. बाबासाहेबांचे झालेच नाहीत. काय त्यापासून बोध घेणार की नाही? इतक्या वर्षांत डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाचा वापर स्वाभिमानासाठी केला नाही. करीत नाहीत ते लोक कायम मागासलेल्या मनोवृत्तीचे राहून डॉ. बाबासाहेब आंबेडकराचं नाव वापरून त्यांचा अपमान करीत कायमच लाचारीचं जीवन जगतील. यांत शंका नाही. हे आजपर्यँत दिसतेच आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आज हयात असते तर भारत देश विश्वगुरू बनण्यापेक्षा त्यानं समाजहिताकडे अधिक लक्ष दिले असते. जो समाज आज संख्येने शी कोटी कंगाल आहे, त्याला विश्वगुरू बनण्यांचे गाजर दाखवून उपयोग काय? बाबासाहेब अर्थतज्ञ् होते त्यांनी खाजगीकरणाला विरोध तर राष्ट्रियकरणाला समर्थन दिले असते. आणि इतक्या मोठया संख्येने रेशन फुकट घेणाराच्या हाताला काम देऊन राष्ट्राच्या संपतीत तूट भरून काढता येते हे दाखवून दिले असते. पण राशन फुकट, लाडक्या बहिणींना रोख रक्कमा फुक्कत देऊन राज्य चालवणारे सरकार सक्षम नाही असं चित्र आहे. हे म्हणायला हरकत नाही. भारत देश आर्थिक गुलामगिरी कडे गेला तर पुन्हा देश गुलाम होईल. मग आमची सुटका करायला या देशातील भ्रामक कल्पना कामी येणार नाहीत. त्या पूर्वीही कधी कामी आल्या नव्हत्या. विश्वगुरु बनण्याची अशी कोणती पात्रता आपल्याकडे आहे ? सत्तर पंच्याहतरीत शिक्षण महाग करुन हगनदारी मुक्त गाव करण्यापलीकडे काहीही केलेले नाही. आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर हयात असते तर त्यांनी नीतिमत्तेचा आग्रह धरला असता. पण ते अजात शत्रू राहिले असते का? की त्या शिल्पकारांचाही खून केला असता? हे असंभवनीय म्हणता येणार नाही. याचे कारण ते ज्या समाजासाठी लढले आणि त्यांचे राष्ट्रीय प्रेम ज्या देशासाठी होते तो समाज आणि देश आज कृतघ्न आहे.! कृतघ्न आहे!, कृतघ्न आहे!

*******

मधुकर मोहिते

२७ जाने. २०२५.

# विवाह-कायद्यांबाबत आजचा भारत बुरसटलेलाच

समलैंगिकांच्या हक्कांचा विचार करायचा तर भारताबद्दल अगदीच निराशावादी सूर नाही लावता येत आशियातल्या, आपल्या आसपासच्या काही देशांत आजही स्वेच्छेने ठेवलेले समलिंगी संबंध हा फौजदारी गुन्हा माला जातो. पण या असल्या देशांशी आपण आपल्या ‘जगातल्या सर्वांत मोठ्या लोकशाही’ची तुलना करण्यात समाधान मानायचे का, हा खरा प्रश्न आहे. एकीकडे उत्तराखंडसारख्या लहान राज्यात ‘समान नागरी कायदा’ आणण्याच्या मिषाने ‘लिव्ह इन’चीही नोंदणी सक्तीची झालेली असताना, एकमेकांना जन्माचे जोडीदार मानून विवाह–नोंदणी करायला उत्सुक असलेल्या समलिंगी जोडप्यांना मात्र विवाहाचा हक्क नाही. सर्वोच्च न्यायालयाने २०२३ मध्येच हा हक्क नाकारला आहे आणि त्या निकालाचा फेरविचार करावा, अशी याचिकासुद्धा २०२५ मध्ये (९ जानेवारी रोजी) सर्वोच्च न्यायालयाने फेटाळलेली आहे. कारण काय तर, आधीच्या निकालातच सर्वोच्च न्यायालयाने समलिंगी विवाहांना मुभा देणारा कायदा संसदेने संमत करून अमलात आणावा असे म्हटले होते.

या बाबतीत मात्र आपण मागेच राहिलो. अनेक आशियाई देशांमध्ये आज समलिंगी विवाह कायदेशीर मानले जातात. थायलंड हासुद्धा आपल्याप्रमाणेच परंपरांचा अभिमान असणारा देश, पण तिथल्या लोकप्रतिनिधी–गृहानेसुद्धा मार्च २०२४ मध्ये प्रचंड बहुमताने (बाजूने ४०० मते, विरोधात फक्त १०) समलिंगी विवाह विधेयक संमत केले. थायलंडच्या वरिष्ठ सभागृहात म्हणजे सिनेटमध्ये हेच विधेयक १३० विरुद्ध ४ अशा बहुमताने जून महिन्यात मंजूर झाले आणि मग ऑगस्ट २०२४ मध्ये थायलंडचे राजे वज्रालंकोरन यांच्या मान्यतेची मोहोर त्यावर उमटून ते अमलातही आले. त्याहीआधी, किंबहुना अख्ख्या आशिया खंडात समलिंगी विवाहांना कायदेशीर ठरवणारा पहिला देश म्हणजे तैवान. तैवानी घटनात्मक न्यायालयाने २०१७ मध्येच समान हक्कांच्या न्यायतत्त्वाआधारे त्या देशातील समलिंगींनाही कायदेशीरपणे आपल्या पसंतीचा समलिंगी जोडीदार निवडण्याचा हक्क आहे, असा निकाल दिला. यावर गदारोळ उठला, ‘सार्वमत’ घेऊन विरोधातील मताधिक्याच्या बळावर या हक्काची मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न झाला, पण तैवानी पार्लमेण्टने धडाडी दाखवून २०१९ मध्ये समलैंगिकांना विवाहाचा हक्क देणारा कायदा संमत केला. तेवढ्यावरच न थांबता २०२३ मध्ये तैवानच्या पार्लमेण्टने, अशा वैधरीत्या विवाहबद्ध झालेल्या समलिंगी जोडप्यांना मूल दत्तक घेण्याचा हक्कसुद्धा कायद्याने बहाल केला. त्याच वर्षी नेपाळच्या सर्वोच्च न्यायालयाने हंगामी निकालाद्वारे अशा विवाहांना मान्यता दिल्यामुळे २०२३ पासून नेपाळमध्येही समलिंगी विवाहांची रीतसर नोंदणी सुरू झालेली आहे.



भारतात हिंदू पद्धतीने– सात फेरे घेऊन– एकमेकींशी विवाह करण्याचे धाडस १९८७ सालात महिला पोलीस लीला नामदेव आणि तिची मैत्रीण ऊर्मिला श्रीवास्तव यांनी दाखवले होते. तेव्हाच्या ‘दूरदर्शन’सह बहुतेक वृत्तपत्रांनी या विवाहाला सचित्र प्रसिद्धीही दिली होती. त्या वेळी तर एकंदर जगभरातच समलिंगी विवाहांचा हक्क, कायदेशीरपणा यांची चर्चा पुरेशी सुरूही झालेली नव्हती. ऑक्टोबर २००५ मध्ये मी लिहिलेले (इथे ‘राइट’ अशा उच्चाराचा शब्द हक्क आणि लग्नाचे ‘विधी’ याही अर्थाने वापरलेला आहे) हे पुस्तक प्रकाशित झाले. यादृष्टीने अभ्यास करण्यासाठी मी प्रेरित झाले तीच मुळी लीला नामदेव आणि ऊर्मिला श्रीवास्तव या दोघींच्या विवाहामुळे. मग १९८० आणि ९० च्या दशकांमध्ये कित्येक समलिंगी जोडप्यांनी अशा प्रकारे– धार्मिक विधी करून– विवाह केलेले आहेत, त्यांचाही आढावा या अभ्यासात घेतला गेला. केवळ भारतात नव्हे तर नेपाळमध्येही अशा अनेकजणी होत्या. ही समलिंगी जोडपी समाजाच्या सर्व थरांतली होती– अनेकींना (कधी जोडप्यातल्या दोघींनाही) इंग्रजी येत नव्हते, बऱ्याचजणी निम्न मध्यमवर्गीय होत्या, काहीजणी शेतमजूरसुद्धा होत्या. बहुतेकींना कोणत्याही सामाजिक चळवळीची माहिती नव्हती (समलिंगींची चळवळ तर १९८० मध्ये दिसतही नव्हती) तरीही, प्रसंगी जातीपातींचा विचार न करता त्यांनी त्यांच्या समलिंगी जोडीदाराशी विवाहबंधन स्वीकारले होते. याला घरच्यांचा विरोध असणारच होता, अनेकींच्या कुटुंबियांनी त्या जोडीला एकमेकीपासून तोडून आपापल्या घरांत वा दूरच्या नातेवाईकांकडे डांबले होते, यापैकी काहीजणींचा मानसिक छळ इतका झाला की त्यांनी आत्महत्या केली. काहीजणींनी जोडीनेच आत्महत्येचा निर्णय घेतला. अर्थात काही थोडी कुटुंबे समजून घेणारीही होती, त्यांनी विधिवत विवाह लावून दिले. पण आजही समलिंगी जोडप्याने जोडीनेच आत्महत्या केल्याचे प्रकार घडत असतात.

भारतासह प्रत्येक संस्कृतीच्या इतिहासात समलिंगी संबंध अस्तित्वात असल्याचे पुरावे असूनही, समलिंगी विवाहाची कल्पना हे जणू पाश्चात्य खूळ आहे , असे मिथक कायम आहे. त्याहून खेदाची बाब म्हणजे, सर्वोच्च न्यायालयाने समलिंगी विवाहांना मान्यता जरी दिली नसली तरी याविषयीच्या ३६६ पानी निकालपत्रात या मिथकाला खोडून काढले आहे. न्यायमूर्तींनी एकंदर प्रश्नाचा ऊहापोह करतेवेळी लव्हज राईट आणि माध्यमांमधून समलिंगी विवाहांचे तपशील आणि प्रकरणे उद्धृत केली आणि मान्य केले की समलिंगी विवाह पश्चिमेकडून आयात केलेला नाही आणि तो भारतीय संस्कृती आणि समाजाचा एक भाग आहे कारण समलिंगी संबंधांकडे झुकणारे लोक भारतीयदेखील आहेत. आणि तरीही, सर्वोच्च न्यायालयाने या लाखो भारतीयांच्या स्वातंत्र्य आणि समानतेच्या घटनात्मक अधिकारांना मान्यता न देण्याचा निर्णय घेतला. तोही , या विवाहांना कायदेशीर दर्जा देण्याचा आधिकार संसदेला आहे, अशा शब्दांत– म्हणजे संसदेवरच विसंबून.

सर्वोच्च न्यायालयाने समलिंगी जोडप्यांना ‘घरगुती भागीदारी’ (डोमेस्टिक पार्टनरशिप) देण्यासही नकार दिला, ज्यामुळे त्यांना लग्नाचे काही पण सर्व अधिकार मिळाले असते. याचा दुष्परिणाम असा की, ४० वर्षांपासून एकत्र राहिलेले समान लिंगाचे दोन भारतीय एकमेकांसाठी वैद्यकीय उपचारांबाबतचे किंवा अंत्यसंस्काराचे निर्णय घेऊ शकत नाहीत, मृत्युपत्राशिवाय एकमेकांकडून वारसा घेऊ शकत नाहीत आणि वैद्यकीय विमा किंवा पेन्शन लाभ घेऊ शकत नाहीत; परंतु एका दिवसासाठी लग्न केलेल्या भिन्नलिंगी जोडप्याला हे सर्व अधिकार आहेत. ज्यांच्याकडे ऐपत आहे आणि बड्या वर्तुळात ओळखीपाळखी आहेत, अशी समलिंगी जोडपी काही अडथळ्यांमधून निभावून नेऊ शकतात परंतु उरलेल्या बहुतेकांना त्रासच होतो. यावर इलाज म्हणून काही भारतीयांनी, इतर देशांमध्ये जाऊन समलिंगी जोडीदारांशी कायदेशीररित्या लग्न केले पण असे भारतीय आज दोन भिन्न कायदेशीर दर्जांच्या त्रिशंकू अवस्थेत आहेत. ते थायलंड किंवा अर्जेंटिनासारख्या काही देशांमध्ये लग्न करतात, परंतु भारतात ‘अविवाहित’ म्हणूनच त्यांना राहावे लागते. भारतीय महिलेशी लग्न केलेला परदेशी पुरुष किंवा भारतीय पुरुषाशी लग्न केलेली परदेशी महिला यांना भारताचे नागरिकत्व मिळवता येते, त्यांना आवडेल तोपर्यंत ते भारतात राहू शकतात आणि नोकरीधंदाही करू शकतात, परंतु समान लिंगाच्या भारतीयाचा परदेशी जोडीदार पर्यटक व्हिसावर भारतात फक्त सहा महिने राहू शकतो. हा भेदभाव स्पष्टपणे अन्याय्य आहे.

थायलंड हा बौद्ध बहुसंख्येचा देश आहे, तैवानच्या लोकसंख्येत एक तृतीयांश बौद्ध आणि एक तृतीयांश ताओवादी आहेत; तर नेपाळमध्ये ८१.९ टक्के हिंदू आहेत. हिंदू धर्म आणि बौद्ध धर्माने कधीही समलैंगिकतेला गंभीर गुन्हा मानलेले नाही– याउलट ख्रिस्ती, ज्यू आदी अब्राहमिक धर्मांनीच समलैंगिकतेला गुन्हेगारीकरण केले आहे. अनेक हिंदू ग्रंथ समलैंगिकतेला मानवी स्वभावाचा भाग म्हणून दर्शवितात आणि समलैंगिक प्रेमाचा उत्सव देखील साजरा करतात (याचा सप्रमाण ऊहापोह २००० मध्ये प्रकाशित झालेल्या, सलीम किडवाई यांच्यासह मी सहसंपादित केलेल्या ‘सेम सेक्स लव्ह इन इंडिया– रीडिंग फ्रॉम लिटरेचर ण्ड हिस्टरी’ या पुस्तकातही आहे). त्यातही वादाचा मुद्दा असा की, ‘समान नागरी कायद्या’चा बोलबाला सुरू होण्यापूर्वी भारतात मुस्लिमांना बहुपत्नीत्वाची मुभा असल्याचे आपण गृहीतच धरले होते– उलट तैवान, नेपाळ, थायलंड, जपान आणि सर्व पाश्चात्य लोकशाही देशांमध्ये अशी मुभा नाही मुद्दा असा की, भारत हा अशा काही लोकशाहींपैकी एक आहे जो विवाहातील विविधतेला धार्मिक अल्पसंख्याकांसाठी मान्यता देतो, परंतु लिंगभाव–अल्पसंख्याकांसाठी मात्र असे वैविध्य नाकारतो! सर्वोच्च न्यायालयाने समलैंगिक विवाहाला कायदेशीर मान्यता देणे हे संसदेचे काम आहे असे सांगितल्यानंतरही, भारतीय संसदेने याबाबत काहीच केलेले नाही. तैवान, थायलंड, नेपाळ हेही देश या सामाजिक सुधारणेत आपल्या पुढे निघून गेलेले आहेत. माझ्या आयुष्यात तरी आपल्या देशात समलिंगी विवाहांना कायदेशीर दर्जा मिळेल का, मला शंकाच आहे.

# देशातील भ्रष्टाचार निर्मूलनासाठी राजकीय पुढाऱ्यांनी गांधींजींच्या विचारांचे अनुकरण करावे.

अहिंसेच पुजारी महात्मा गांधी यांची पुण्यतिथी ३० जानेवारीला साजरी करण्यात येते.त्या निमित्ताने भ्रष्ट अधिकारी व भ्रष्ट राजकीय पुढाऱ्यांवर अंकुश लावण्याकरिता राज्य व केंद्र सरकारने जातीने लक्ष देण्याची गरज आहे. याकरीता राजकीय पुढाऱ्यांनी महात्मा गांधींच्या विचारांची जोपासना करणे आवश्यक आहे.कारण आपण स्वतंत्र भारतात रहातो.त्यामुळे आपल्याला आपल्याच देशात आपल्याच लोकांच्या गरजा व देशाचा विकास या उद्देशाने राजकीय पुढाऱ्यांनी कार्य करण्याची गरज आहे.राजकीय पुढाऱ्यांना याकरिता जास्त मेहनत किंवा मोठा संग्राम करण्याची गरज नाही.फक्त राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या विचारांचे स्मरण करावे व आपली धनसंपत्ती देशहितासाठी समर्पित करावी एवढे काम जर आत्मियतेतून केले तर अवश्य गांधीजींच्या विचारांना दुजोरा मिळेल आणि देश सुजलाम सुफलाम होण्यास मोठी मदत मिळेल.देश स्वतंत्र करण्यासाठी देशाला १५० वर्षे लागलीत म्हणजेच ५४७५० दिवस यात क्रांतीकारी विचार,जहालवादी-मवाळवादी विचार व अहिंसेचा मार्ग यातुनच १५ ऑगस्ट१९४७ ला स्वतंत्र भारत उदयास आला.भारत स्वतंत्र करण्यासाठी महात्मा गांधी यांनी अहिंसेचा मार्ग अवलंबला व आपले संपूर्ण आंदोलन अहिंसेच्या मार्गाने सुरू ठेवले व इंग्रजांना भारत सोडण्यास भाग पाडले. गांधीजीचा कार्यकाळ जन्मापासुन तर मृत्यू पर्यंत अत्यंत संघर्षमय रहाला व आपले संपूर्ण आयुष्य देशाच्या स्वातंत्र्यासाठी समर्पित केले.३० जानेवारी १९४८ हा दिवस महात्मा गांधींसाठी काळ ठरला.नाथुराम गोडसे महात्मा गांधींच्या विचारां सहमत नव्हते.त्यामुळे ३० जानेवारी १९४८ ला नाथुराम गोडसे यांनी दिल्ली येथील बिर्ला भवनात गांधींच्या प्रार्थना सभेत गांधींजींच्या ४० मिनिटे आधी पोहोचले व गांधीजी सभेला जात असताना नाथुराम यांनी तीन गोळ्या झाडून महात्मा गांधींचा खुन केला व अहिंसेचा दिवा नेहमीसाठी मावळला यानंतर संपूर्ण भारत स्तब्ध झाला. तेव्हापासुन ३०जानेवारी हा दिवस शहिद दिवस म्हणून पाळन्यात येतो.भारतात फक्त ३०जानेवारी हा एकमेव शहिद दिवस नसुन १५० वर्षांच्या काळात लाखोंच्या संख्येने ज्यांनी-ज्यांनी बलीदान दिले ते संपूर्ण दिवस आपल्यासाठी शहिद दिवसच आहे.महात्मा गांधी हे अहिंसेचे मुख्य मार्गदर्शक होते.त्यामुळेच त्यांना राष्ट्रपिता हा सन्मान नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी दिला.महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस, भगतसिंग, राजगुरू, तात्या टोपे,चंद्रशेखर आझाद, झाशीची लक्ष्मीबाई, लोकमान्य टिळक,लाला लजपतराय इत्यादीसह लाखो शहिदांच्या बलिदानाने अखंड भारत मोठ्या डौलाने उभा झाला.यामुळे देशातील १४० करोड जनता स्वतंत्रपणे बागडताना दिसते.आज देशातील संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांना खऱ्या अर्थाने गांधींच्या तत्वांची आवश्यकता आहे.कारण गेल्या २० वर्षांपासून ८० टक्के राजकीय पुढारी भ्रष्टाचारी, माफीयाराज, बाहुबली, घोटाळे करणे, अत्याचार, गुन्हेगारी, गरीबांची संपत्ती वाममार्गाने हडप करने किंवा लुटने इत्यादी अनेक प्रकार काही राजकीय पुढाऱ्यांच्या अंगी असल्याचे दिसून येते.या ८० टक्के राजकीय पुढाऱ्यांनी जर खऱ्या अर्थाने गांधींजींचा मार्ग अवलंबला तर देश भरभराटीला अवश्य येईल.कारण महात्मा गांधी सत्य, अहिंसा या विचारांचे खरे पुजारी होते.आपण त्यांची जयंती, पुण्यतिथी मोठ्या थाटात साजरी करतो तर मग त्यांचे विचार खऱ्या अर्थाने आजचा राजकीय पुढारी अमलात व आचरणात का आणत नाही? हा प्रश्न आजही देशाच्या १४० कोटी जनतेच्या मनात भेडसावत असतो.आज आपण विचार केला तर मुठभर राजकीय पुढारी आहेत.परंतु त्यांच्या जवळ एवढी संपत्ती आहे की त्यांच्या सात पिढ्या बसुन खावु शकतात.यांचा संपूर्ण पैसा राज्य सरकार व केंद्र सरकार यांनी एकत्र केला तर अरबो रूपयांची चल-अचल संपत्ती आपल्याला दिसुन येईल व १० ते १५ वर्षे कोणत्याही देशाजवळुन कर्ज घेण्याची गरज भासणार नाही.याकरीता देशातील संपूर्ण राज्य सरकारे व केंद्र सरकार यांनी निसंकोचपणे राजकीय पुढाऱ्यांनी वाममार्गाने कमवीलेली करोडोंची संपत्ती सरकारी तिजोरीत जमा करण्याच्या उद्देशाने कठोर पाऊल उचलण्याची गरज आहे. तेव्हाच महात्मा गांधींना व देशाच्या शहिदांना खरी श्रद्धांजली ठरेल.देशाचे संपूर्ण सैन्यशक्ती स्थलसेना, वायुसेना, नौसेना देशाच्या रक्षणासाठी उन, पाऊस, थंडी, वादळ, सुनामी इत्यादींशी झुंज देऊन व सामना करून देशाच्या १४० कोटी जनतेच्या सुरक्षेसाठी ढाल म्हणून तैनात व अग्रेसर आहेत. तर मग देशातील आजी-माजी राजकीय पुढारी आपली खरी संपत्ती का लपवीतात? राजकीय पुढाऱ्यांमध्ये खरोखरच देशभक्ती, देश प्रेम, देशहित,शहिदांच्या प्रती आदर व सन्मान आणि क्रांतीकारकांच्या प्रती अभिमान असेल तर देशाच्या विकासासाठी आपली अवाजवी संपत्ती स्वखुशीने सरकारच्या तिजोरीत अर्पण करायला हवी.देशातील प्रत्येक थोर पुरुषांच्या घोषणेचा व स्लोगनचा देशहितासाठी उपयोग होता.त्यात नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी स्वतंत्र लढ्यासाठी दिलेले ब्रिदवाक्य राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे तुम मुझे खून दो मैं तुम्हे आझादी दुंगा याचेच अनुकरण करत राजकीय पुढाऱ्यांनी आपली संपत्ती देशहितासाठी समर्पित करावी यामुळे देशातील महागाई, बेरोजगारीची व इतर समस्या दूर होऊन देशाचा विकास भरभराटीला येवुन सुजलाम सुफलाम होण्यास मदत होईल.३० जानेवारी शाहिद दिनाच्या निमित्ताने संपूर्ण भारतात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे.कारण प्रत्येक वृक्ष अनंत काळापर्यंत राहिल व यामुळे शहिदांची आठवण सुद्धा अनंत काळापर्यंत राहिल आणि प्रत्येक पानात,फुलात, फळात आपल्याला शहिदांचे दर्शन अवश्य होईल.त्याचप्रमाणे वाढते प्रदुषण रोखण्यास मोठी मदत होईल.जय हिंद!



*************

लेखक.

रमेश कृष्णराव लांजेवार.

(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर) मो.नं.९९२१६९०७७९,

नागपूर.

# शहरातील नागरिक ठरवणार लातूर मनपाचे बजेट !

## अंदाजपत्रकासाठी सूचना पाठविण्याचे मनपाचे आवाहन

लातूर/प्रतिनिधी:लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने सन २०२४-२५ चे सुधारित व सन २०२५-२६ चे मूळ अंदाजपत्रक तयार केले जात आहे.हे अंदाजपत्रक (बजेट )तयार करताना लातूरकरांच्या मनात काय आहे ? हे जाणून घेत त्यांच्या सूचनांचा अंतर्भाव त्यात केला जाणार आहे. यासाठी नागरिकांनी सूचना पाठवाव्यात,असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

अंदाजपत्रकामध्ये शहरातील नागरिकांचा सहभाग असावा, या हेतूने मनपा गेल्या काही वर्षांपासून हा उपक्रम राबवित आहे.शहरातील नागरिक, सामाजिक संघटना,ज्येष्ठ नागरिकांनी अंदाजपत्रकासाठी सूचना पाठवाव्यात,असे मनपाला अपेक्षित आहे.मनपाच्या उत्पन्नात वाढ,खर्चात बचत,सेवा- सुविधांमध्ये सुधारणा तसेच शहराच्या विकासात्मक दर्जात वाढ करण्यासाठी नागरिक सूचना करू शकतात.शहरातील नागरिक आपल्या सूचना व अभिप्राय मनपाच्या या मेलवर तसेच मनपाच्या मुख्य कार्यालयात लेखा विभागात ठेवलेल्या सूचनापेटीमध्ये टाकू शकतात. दि.०४ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत नागरिक सूचना पाठवू शकतात.

या माध्यमातून लातूरकर मनपाचे बजेट तयार करण्यात सहभागी होऊ शकतात. मनपाचे अंदाजपत्रक सर्वसमावेशक व नागरिकाभिमुख करण्यासाठी नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होत आपल्या सूचना पाठवाव्यात,असे आवाहन महापालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

# संविधान जागृती अभियानात प्रभात फेरी काढण्यात आली.

भांडुप / प्रतिनिधी :-२६ जानेवारी १९५० साली भारतात संविधान लागु झाले आज आपण देशात संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करत आहोत.आज आम्ही सर्व भारतीय लोक मोठय़ा उत्साहाने हा दिवस साजरा करत आहोत. ज्याचाकडे अजुनही संविधानाची प्रत नसेल त्यांनी या अमृत महोत्सवी वर्षाचे औचीत साधुन आपल्या घरी संविधानाची प्रत आणावी आणी त्याचे वाचन करून घरोघरी संविधान हे अभियान चालववे.या संविधानात बहुजनांना आपले हक्क मिळाले आहे.यात देशातील विषमता दुर करण्याची ताकद आहे.संविधान आणि त्यातील मूल्ये यांची सांगड घालण्यासाठी जनजागृती करणे ही काळाची गरज आहे. हे लोकांना असमानता आणि अन्याय ओळखण्यास आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी कारवाई करण्यास मदत करेल.तसेच तरुणांना संविधानात दिलेले मुलभूत हक्क आणि मूल्ये माहीत असावीत, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेला अनुसरून राष्ट्रीय समाजाची निर्मिती करणे आणी स्वातंत्र्य,समता,बंधुता ची जाणीव निर्माण करुन संविधानप्रेमी समाज निर्माण करणे हा या संविधान जागृती कार्यक्रमाचा उद्देश आहे.याचेच औचीत साधुन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष,डि.वाय.एफ.आय शिवाजी नगर युनिट च्या वतीने भारतात संविधानाचे अमृत महोत्सवी वर्षानिमित्याने मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष,डि.वाय.एफ.आय शिवाजी नगर शाखा कार्यालयावर कॉमरेड हेमकांत सामंत यांच्या हस्ते झेंडा वंदन करण्यात आले.त्या नंतर प्रभात फेरी काढण्यात आली. टेंभीपाडा,नरदास नगर,माता रमाबाई आंबेडकर नगर,साई विहार,केदारे चौक अशी प्रभात फेरी काढण्यात आली प्रचार फेरीत प्रत्येक चौकात गीत व भाषणांच्या माध्यमातून लोकांचे प्रबोधन करण्यात आले. प्रचार फेरीचा समारोप



भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाचनालय येथे करण्यात आले. आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ट नेते प्रा.जगन्नाथ बावा,भगवान साळवे,मिलिंद गायकवाड, ज्येष्ठ साहित्यिक निर्भीड पत्रकार सागर तायडे,यांनी या प्रचार फेरीचे स्वागत करून मार्गदर्शन केले. तसेच गणेश सोसायटी,माता रमाबाईनगर,मधीलसदस्य चंद्रकांत जाधव,टणजी बागवे,सुधाकर नाईक,महाडीक,प्रशांत गायकवाड परिवार,समता साहित्य लोककला केंद्र केंद्राचे कवी गायक रुपेश साखरे,गौतम मोर,श्रीकांत गायकवाड,अनिल गमरे,जंगल मंगल मित्र परिवार,विलास कदम,प्रबोधन कला मंच,संदीप पटेकर,मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष,डि.वाय.एफ.आय शिवाजी नगर युनिट सदस्य यान सहभाग घेतला. प्रचार फेरीच्या समारोपाच्या शेवटी युनिट सचिव कॉमरेड अनिकेत पवार यांनी सर्वांचे आभार मानले.समविचारी संघटना,पक्षाच्या कार्यकर्त्यांनी व लोकांनी प्रत्येक चौकात उत्तम प्रतिसाद देऊन सहभाग नोंदविला.

# मी दिवसातून १६ चमचे तूप खातो, आतड्याच्या आरोग्यतज्ज्ञांनी केला दावा; पण, हे खरंच योग्य आहे का? वाचा, पोषणतज्ज्ञांचे मत

तूप हे भारतीय स्वयंपाकघरांमधील एक प्रमुख पदार्थ आहे. तुम्ही भातावर किंवा पराठ्यावर थोडेसे तूप लावू शकता किंवा तुमच्या सकाळच्या कॉफीमध्ये एक चमचा तूप टाकू शकता. नियमित तुपाच्या सेवनामुळे निरोगी फॅट्स देणे आणि आतड्यांचे आरोग्य सुधारण्याबाबत ते इतर अनेक फायदेही देतात. पण, तुपाचे सेवन किती प्रमाणात केले पाहिजे? किती चमचे तुपाचे सेवन केल्यास ते अतिसेवन ठरू शकते. याबाबत एका डिजिटल क्रिएटर आणि आतड्याचे आरोग्यतज्ज्ञ प्रशांत देसाई यांनी एका इन्स्टाग्राम रीलमध्ये खुलासा केला आहे की, ते दिवसातून १६ चमचे तूप खातात, ज्यामुळे पोट भरलेले राहते, ग्लुकोजच्या वाढीस त्यामुळे प्रतिबंध होतो आणि चयापचयात लवचिकता येते. पोषणतज्ज्ञ हेतल छेडा यांनी कमेंटमध्ये नमूद केले आहे की, ज्या दिवशी ते १६ चमचे तूप खातात, तेव्हा ते जाणून बुजून किंवा नकळत केटो दिनचर्या (कमी कार्बोहायड्रेट, जास्त फॅट्सयुक्त आहार घेणे ज्यामुळे शरीर ऊर्जा निर्माण करण्यासाठी फॅट्सचा वापर करते) पाळतात आणि त्या दिवशी तूप (फॅट्स) हे शरीरात ऊर्जा तयार करते.



१६ चमचे तूप खाणे सुरक्षित आहे की नाही आणि त्याशी संबंधित आरोग्य धोके जाणून घेण्यासाठी इंडियन एक्सप्रेसने पोषणतज्ज्ञाशी संवाद साधला

तुपाचे संभाव्य फायदे असले तरी दिवसातून १६ चमचे सेवन करणे हे एक महत्त्वपूर्ण प्रमाण आहे. कॅलरीज आणि फॅट्सचे प्रमाण विचारात घेणे महत्त्वाचे आहे. तुपात सॅच्युरेडेट फॅट्सचे प्रमाण जास्त असते, जे जास्त प्रमाणात सेवन केल्यास हृदयरोगास कारणीभूत ठरू शकते, असे क्लिनिकल आहारतज्ज्ञ सना शेख म्हणाल्या.

जरी तूप हे उच्च फॅट्सयुक्त आणि कमी कार्बोहायड्रेट घटकांमुळे केटो-फ्रेंडली अन्न आहे, तरीही दिवसातून १६ चमचे सेवन करणे हे प्रमाण जास्त आहे. या प्रमाणात कॅलरीज आणि फॅट्सचे अतिसेवन होऊ शकते, ज्यामुळे केटोजेनिक आहाराचे फायदे कमी होऊ शकतात, असे त्या पुढे म्हणाल्या.

तुपाला तुमच्या नियमित आहाराचा समावेश करण्याचे फायदे सांगताना शेख यांनी नमूद केले की, ते जीवनसत्त्वे अ, ड, ई आणि के, तसेच दृष्टी, हाडांचे आरोग्य आणि रोगप्रतिकारक शक्ती यासह विविध शारीरिक कार्यांसाठी आवश्यक असलेल्या आवश्यक फॅटी सिडने समृद्ध आहे. त्याचे दाहकविरोधी गुणधर्म हृदयरोग आणि संधिवातसारखे दीर्घकाळ टिकणारे आजार कमी करण्यास मदत करतात.

शेख यांच्या मते पारंपरिक आयुर्वेदिक पद्धतींमध्ये पचन सुधारण्यासाठी तुपाचा वापर बराच काळ केला जात आहे; कारण ते पचनसंस्थेला शांत करण्यास आणि पोषक तत्वांचे योग्य शोषण करण्यास मदत करते असे मानले जाते.

तुम्ही दररोज किती तूप सेवन करावे? शेख यांनी सांगितले की, बहुतेक आरोग्यतज्ज्ञ दररोज तुपाचे सेवन १-२ चमचे मर्यादित ठेवण्याचा सल्ला देतात आणि तुमच्या विशिष्ट गरजा एकूण आहार, व्यायाम पातळी आणि आरोग्य स्थिती यासारख्या घटकांवर अवलंबून बदलू शकतात.

हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की, केटो आहार घेतानादेखील संयम महत्त्वाचा आहे. जर तुम्हाला तुमच्या कोलेस्ट्रॉलच्या पातळीबद्दल किंवा इतर आरोग्य स्थितींबद्दल चिंता वाटत असेल तर वैयक्तिक मार्गदर्शनासाठी नोंदणीकृत आहारतज्ज्ञ किंवा आरोग्य सेवा प्रदात्याचा सल्ला घेणे योग्य आहे, असे त्या पुढे म्हणाल्या.

# राष्ट्रीय महामार्ग १६१ किनवट शहरात रखडलेल्या कामास सुरुवात तर काही ठिकाणी बोगस कामे

किनवट तालुक्यात मागील सहा वर्षापासून रखडलेला रस्त्याला मुहूर्त लागला असला तरीही राष्ट्रीय महामार्ग १६१ याला बऱ्याच कालावधीनंतर शहरातून रस्ता बनवण्यास सुरुवात झाली. संबंधित कंपनीने वादाच्या भोवऱ्यात अडकले रस्ता याचा गैरफायदा घेत अनेक ठिकाणी मनमर्जीप्रमाणे बोगसरीत्यारस्त्याचे कामे होत असल्याचा प्रकार उघडकीस येत आहे.संबंधित प्रशासनाने सदरील काम हे नाली ते नाली तरी परिपूर्ण करावे अन्यथा परत या रस्त्याला थांबा होण्याची शक्यता निर्माण होणार असल्याचे जनतेमधून चर्चिले जात आहे.

किनवट/शेख शौकत :-भोकर फाटा ते धनोडा पर्यंत राष्ट्रीय महामार्गाच्या कामास विविध प्रकारच्या एजन्सीला कामे देण्यात आले किनवट चे नशीब खराब म्हणावे असे कोठारी ते ईस्लापुर पर्यंत पांदण रस्ता बनवणाऱ्या गुत्तेदाराला काम दिल्यामुळे संपूर्ण कामेही बोगसरीत्या झाल्याची चित्र किनवट तालुक्यात आहे. महामार्गाच्या प्रकारच्या देण् असे कामेतर कोठारी ते धनोडा पर्यंत रस्त्याची कामे ही ठीक ठाक दिसतं शारदा कॉन्ट्रक्शन कंपनीला दिले असून शहरापासून धनोड्यापर्यंत रस्ता झाला असून काय काय ठिकाणी खड्डे दिसत आहे. परंतु मागील सहा वर्षापासून शहरातील राष्ट्रीय महामार्ग रस्ता हा वादाच्या भोवऱ्यात अडकल्याने प्रश्न सोडवावा कोण ? आणि रस्ता बनवणार कोण ? हा गंभीर प्रश्न निर्माण असताना शहर व परिसरातील सुज्ञ नागरी व प्रसिद्धी माध्यमांनी पाठपुरावा करून अतिक्र मण न हटवता न्यायालयाचा निकाल लागेपर्यंत आज घडीला आहे तो रस्ता बनवून द्या व किनवटकरांची धूळ व खड्ड्यांपासून मुक्तता करा या गोष्टीला सहा वर्षानंतर शुभारंभआला असला तरी अडचण पाहता उच्च समजल्या जाणाऱ्या संबंधित कंपनीने नाली ते नाली रस्ता काम घेण्याऐवजी मन मर्जीप्रमाणे जयस्तंभ चौक पासून नालीच्या बाजूला जागा सोडून काम करत असल्याचा प्रकार होत असल्याने शहरातील सुज्ञ नागरिकात नाराजी व संताप निर्माण होत आहे.





## ५५ किलो वजन कमी करायला अभिनेत्याने वापरला 'हा' फंडा; फक्त टाळा 'या' चुका; वाचा डॉक्टर काय सांगतात

राम कपूर आणि साक्षी तन्वर यांची 'बडे अच्छे लगते हैं' ही मालिका प्रचंड गाजली. त्यांच्या मालिकेतील राम कपूर आणि प्रियाच्या जोडीने प्रेक्षकांच्या मनात आजही घर केले आहे. तर काही दिवसांपूर्वी राम कपूर यांचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला होता. त्यामध्ये त्यांचे वजन प्रचंड कमी झाले आहे असे दिसून आले होते. ५५ किलो वजन कमी करणारा अभिनेता राम कपूर, देवना गांधी यांच्या पॉडकास्टवर आपल्या आहाराबद्दल सांगताना म्हणाला, 'मी आता दिवसातून दोनदा जेवतो. सगळ्यात पहिला सकाळी १० वाजून ३० मिनिटांनी किंवा ११ वाजेपर्यंत त्यानंतर दुसऱ्यांदा संध्याकाळी ६ वाजून ३० मिनिटांनी जेवतो. मध्ये कोणतेच स्नॅक खात नाही. ४५ मिनिटे कार्डिओ, ४५ मिनिटे वजन ट्रेनिंग, नैसर्गिक आहार आणि झोपेसह त्यांच्या जीवनशैलीवर काम करतो' असे त्यांनी सांगितले.

दिवसातून फक्त दोनदा जेवणे योग्य आहे का हे जाणून घेण्यासाठी द इंडियन एक्स्प्रेसने मुंबईच्या झायनोव्हा शाल्बी हॉस्पिटलच्या आहारतज्ज्ञ जिनल पटेल यांच्याशी चर्चा केली. तेव्हा त्या म्हणाल्या की, काही व्यक्तींसाठी वजन कमी करण्यासाठी दिवसातून दोनदा खाणे हा एक सस्टेनेबल अप्रोच असू शकतो. पण लोकांना हे समजून घेणे आवश्यक आहे की, वजन कमी करताना त्याचे चांगले परिणाम दिसण्यासाठी, एखाद्याने सतत प्रयत्न करणे खूप आवश्यक आहे. निरोगी वजन कमी करणे पौष्टिक आहाराच्या मदतीने साध्य करता येते. फक्त , ते तुमच्या जेवणाची क्वालिटी, जेवणाचा आकार किंवा भाग आणि वैयक्तिक जीवनशैली यांसारख्या घटकांवरदेखील अवलंबून असते. वजन कमी करण्यासाठी दोनदा खाणे हे इंटरमिटंट फास्टिंग करण्यासारखेच आहे. म्हणजेच इंटरमिटंट फास्टिंग करताना, एखादी व्यक्ती जसे फक्त ठराविक वेळेत आहार घेते.

वजन कमी करण्याऐवजी तुमचे वजन वाढू शकते

पण, हा उपाय प्रत्येकासाठी काम करेलच असे नाही. वजन कमी करण्याऐवजी तुमचे वजन वाढू शकते. कारण उपवासामुळे तुमचे चयापचय लक्षणीयरीत्या कमी होऊ शकते, ज्यामुळे वजन कमी करणे आव्हानात्मक ठरू शकते. खाण्याच्या निर्बंधांमुळे काही लोक जास्त खाण्याकडे प्रवृत्त होतात, ज्यामुळे वजन वाढते; असे जिनल पटेल म्हणाल्या आहेत.

# गांधींचा 'पठाण'!

तसा मूळचा अफगाणिस्तानचा
असलेला हा पठाण.
खान अब्दुल गफारखान.
सहा फुटांहून अधिक उंची.
शंभर किलो वजनाचा आणि
शंभर वर्षे आयुर्मान लाभलेला
रांगडा गडी. एकदम आक्रमक
आणि एक घाव, दोन तुकडे
करणारा.
मात्र, त्याला गांधी नावाचा वेडा
माणूस भेटला.
आणि, हा 'पठाण' आमूलाग्र
बदलून गेला.
तोही संत-महात्मा झाला.
निःसंग फकीर झाला.
बुद्धाची वाट सांगू लागला.
अखेरपर्यंत याच वाटेवरून
चालत राहिला.
जीना आणि सावरकरांच्या
द्विराष्ट्र सिद्धांताला विरोध करत
फाळणी रोखण्यासाठी त्याने
जीव पणाला लावला.
फाळणीनंतर हा पठाण
पाकिस्तानातील वायव्य
प्रांतात गेला. पाकिस्तानातील
जुलूमशाहीला विरोध
करण्यासाठी तुरुंगात गेला.
आणखी एक फाळणी होऊ नये,
यासाठी व्यर्थ धडपडत राहिला.
तहहयात लोकशाही मूल्यांसाठी,
मानवतेसाठी झगडत राहिला.
१९८८ मध्ये म्हणजे वयाच्या
शंभरीत हा पठाण अल्लाघरी
गेला. जाताना त्याने इच्छा
व्यक्त केली होती की माझे
दफन माझ्या अफगाणिस्तानात
व्हावे. तेव्हा सोव्हिएत रशिया
आणि अफगाणिस्तानात घनघोर
युद्ध सुरू होते. मात्र, या
पठाणावरील अंत्यसंस्कारासाठी
दोन्ही देशांनी युद्धबंदी जाहीर
केली. वातावरणात तणाव
असूनही अंत्यदर्शनासाठी अलोट
गर्दी होती.
सोव्हिएत रशियाने त्यांना
सलामी दिली.
'फक्र ए अफगाण' हा किताब
अफगाण जनतेने कधीच दिला
होता.
जन्मभूमी पाकिस्तानने या
पठाणाला खूप प्रेम दिले.
बांगलादेशने त्यांना गौरवले.
आणि, १९८७मध्ये राजीव
गांधी पंतप्रधान असताना त्यांनी
या पठाणाला 'भारतरत्न'ने
सन्मानित केले.
तेव्हा 'सरहद्द गांधी' नावाचा हा
पठाण राजीवला म्हणाला,
आजूबाजूच्या देशांची दैना
बघतोय ना? त्या देशांपेक्षा
भारताची लोकसंख्या जास्त,
प्रश्न खूप, विविधता अधिक.
तरीही तुझा देश झेपावला.
कारण, तुझा आजोबा!
नेहरूंसारखा पहिला पंतप्रधान
या देशाला लाभला. तुझा
आजोबा सगळ्यांना मिळाला,
तर जगाचं कल्याण होईल!
आज पठाण नाही.
गांधी वा नेहरूच काय,
राजीवही नाहीत.
पण, तो वारसा आहे.
रस्त्यांची नावं ते भलेही
बदलतील,
पण रस्ते पत्ते कसे विसरतील?
बागांची नावं त्यांनी बदलली
म्हणून,
फुलं आपला गंध कसा
दडवतील?
कळ्यांचे निःश्वास कसे
चुकतील?
हिरवी बोली झाडं कशी
हरवतील?
बागेचा सात-बारा त्यांच्याकडे
असेल,
पण, ती जमीन तर आपली
आहे.
आपण मिळून ती कसली आहे.
त्यांनी कितीही धूर पसरवला
तरी,
खुणावणारे आकाश आपले
आहे.
त्यांनी कितीही कहर केला तरी,
फुलांचे हे बहर आपलेच आहेत.
त्यांना गांधींना मारता नाही
आले,
पठाणाला संपवता नाही आले.
ते आणखी काय बदलणार?
त्यांना नावं बदलू द्या,
आपण जग बदलू.
त्यासाठी आधी स्वतःच तो
बदल होऊ!
******
**- संजय आवटे**

# स्पर्धा परीक्षेतील यशाकरिता भाषेवर प्रभुत्व हवे - स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक ड. राजेंद्र लातूरकर



लातूर :- मराठी भाषा, साहित्य, वाङ्मय, अनुवाद क्षेत्रात रोजगाराच्या विविध संधी आज उपलब्ध आहेत. कोणत्याही स्पर्धा परीक्षेच्या यशाकरिता भाषेवर प्रभुत्व मिळणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठविधीज्ञ राजेंद्र लातूरकर यांनी केले. ते येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील मराठी भाषा, साहित्य, वाङ्मय व संस्कृती विभाग यांच्या वतीने आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या समारोप सभारंभात स्पर्धा परीक्षा व मराठी व्याकरण या विषयावर साधनव्यक्ती म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते. तर विचारपीठावर मराठी विभागप्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगत् ज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मराठी भाषा व वाङ्मय मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या स्वरचित अस्मिता या भीत्तीपत्रकाच्या काव्यविशेषांकाचे विमोचन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. पुढे बोलताना ज्येष्ठविधीज्ञ ड. राजेंद्र लातूरकर म्हणाले की, मराठी आता ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञान या क्षेत्रात नावलौकिक पावलेली भाषा आहे. मराठी भाषा, साहित्य, वाङ्मय क्षेत्रात रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध आहेत. शिक्षण क्षेत्र, भाषांतर क्षेत्र, पत्रकारिता, दूरदर्शन, चित्रपट संवाद कौशल्य, प्रशासन, सृजनशील लेखन, स्पर्धा परीक्षा यात महाराष्ट्रात मराठीला उच्च व महत्त्वपूर्ण स्थान आहे. भाषेचा सखोल व चिकित्सक अभ्यास केल्यास कोणत्याही स्पर्धात्मक परीक्षा उत्तीर्ण होणे सहज शक्य आहे. केंद्रीय लोकसेवा आयोग, राज्य लोकसेवा आयोग यांच्या पूर्व मुख्य परीक्षेत भाषा साहित्य व्याकरण हे विषय अत्यावश्यक आहेत. विद्यार्थ्यांनी आपल्या जिद्द, चिकाटी, सराव आणि दृढआत्मविश्वास या बळावर परीक्षांना सामोरे जाऊन यशाची उंच उंच शिखरे गाठावीत, असेही ते म्हणाले. आपल्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, प्रत्येक मराठी भाषिकांनी मातृभाषेचा अभिमान बाळगायला हवा. सर्व तऱ्हेच्या व्यवहारात भाषेचा वापर अनिवार्यपणे केला जावा. भाषेविषयक अनास्था न बाळगता भाषेचा गौरव कसा वाढेल याकडे भाषिकांनी लक्ष द्यायला हवे. तरच व्यापार, सामाजिक क्षेत्र, धार्मिक क्षेत्र, सांस्कृतिक क्षेत्र, बँकिंग, न्यायालय यातून मराठी भाषेचा वापर होऊन भाषेचा गौरव वाढेल, असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मारुती माळी यांनी केले. तर उपस्थितांचे आभार प्रा. सागर ठाकूर यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता प्रा. व्यंकट दुडिले, प्रा. शंकर भोसले, प्रा मनीषा भुजबळ, श्री बालाजी डावखरे, श्री संतोष यंचेवाड, सय्यद जलील आदींनी परिश्रम घेतले.

## नेरूळ सारसोळे बसडेपो चौक येथे संविधान अमृत महोत्सव उत्साहात साजरा



नवी मुंबई / के. एच. हनवते : - सालाबाद प्रमाणे याही वर्षी २६ जाणेवारी प्रजासत्ताक दिन व भारतीय संविधानाचा ७५ अमृत महोत्सव सारसोळे बस डेपो चौक, सेक्टर - ८ नेरूळ नवी मुंबई येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात अला यावेळी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना भारताचा राष्ट्रीय ग्रंथ भारतीय संविधान व शाल पुष्पगुच्छ देऊन त्यांचा जाहीर सत्कार करण्यात अला. त्यावेळी उपस्थित मान्यवर : विरेंद्र लगाडे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष (रिपब्लिकन सेना), आणि (बसपा) नवी मुंबई प्रभारी : संजय गायकवाड, माझी पोलीस कर्मचारी : आत्माराम कांबळे याच्या शुभ हस्ते खालील कार्यकर्त्यांना भारतीय संविधान ग्रंथ भेट देऊन सन्मानित करण्यात आले, कामगार युनियन : कोंडीबा हिंगोले, ओबीसी कार्यकर्ते : रामदास पडवळ, नेरूळ जयंती उत्सव समितीचे आरयदास गमरे, पंचशील सामाजिक संस्था भिमराव तायडे प्रकाश रणदिवे, सैराट फिल्म डायरेक्टर : नागराज मंजुळे यांचे टिम वर्क युवा कार्यकर्ते : विपीन ताथड, मंगेश उमक, शिक्षिका निता गवई इत्यादी स्थानिक विभागातील लहान थोर नागरीकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली त्याबद्दल या सर्व कार्यक्रमाचे आयोजक : कल्याणराव एच. हनवते (उपाध्यक्ष) वंचित बहुजन अघाडी बेलापूर तालुका यांनी सर्वाचे मनःपूर्वक जाहीर आभार व्यक्त केले व शेवटी सर्वांना गोड पदार्थ पेढे भरवून आनंद व्यक्त केला.

## पुष्प कॉर्नर हौ. सोसायटीच्या वतीने प्रजासत्ताक दिन हर्षोल्हासात संपन्न



कामोठे :- पुष्प कॉर्नर हौसिंग सोसायटी, सेक्टर १२, कामोठे यांच्या वतीने २६ जानेवारी २०२५ रोजी सोसायटी प्रांगणात ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रमाचे आयोजन दीपक जाधव यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रविण मोरे व सूनय कोटकर यांनी आपल्या भारदस्त आवाजात अत्यंत सुसुत्रतापणे केले. महिला या शक्तीस्त्रोत असून महिला आहेत म्हणूनच पुरुष जन्माला येऊ शकतो ही भावना आणि महिला सशक्तीकरण ही मध्यवर्ती संकल्पना ठेवून सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्यासाठी सोसायटीतील सर्व महिला सभासद, भगिनी, सोसायटीचे सर्व पदाधिकारी, सभासद ध्वजारोहण कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते, सर्वांच्या उपस्थितीत सौ. करुणा सुरेश भगत, सौ. शोभा ठाकूर, सौ. जयश्री कदम यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवण्यात आला. सोसायटीतर्फे सर्व आजी-माजी कार्यकारिणी सभासद यांना पुष्पगुच्छ व मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. सदर प्रसंगी सोसायटीतर्फे सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते ज्या अंतर्गत वक्तृत्व स्पर्धा व चित्रकला स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले ज्यात आबालवृद्धानी सहभाग घेऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली. सरतेशेवटी प्रविण मोरे व सूनय कोटकर यांनी सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पडण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या व कार्यक्रमास उपस्थित राहिलेल्या सर्वांचे आभार मानून राष्ट्रगानाने कार्यक्रमाची सांगता केली.

## केज तालुका सकल मराठा समाजाचा आज श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात रास्तारोको



केज/प्रतिनिधी मनोज जरांगे पाटील त्यांच्या उपोषणाचा आज सहावा दिवस आहे. त्यांची व त्यांच्यासोबत उपोषण करणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांची प्रकृती खालावली आहे. मात्र शासनाने त्यांच्या उपोषणाची अद्याप दखल घेतलेली नाही. त्यांचे आंदोलन हे सकळ मराठा समाजाच्या समस्या सोडवण्यासाठी असल्याने समाजाने त्यांची काळजी घेणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत त्यांच्या जीवाला कधीही धोका होऊ शकतो. शासनाने त्यांच्या उपोषणाची दखल घेऊन तात्काळ चर्चा करावी यासाठी केज तालुका सकल मराठा-बहुजन समाजाच्या वतीने गुरुवार दिनांक ३०जानेवारी २०२५ रोजी सकाळी १०-०० वाजता केज च्या श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात रास्तारोको आंदोलन करण्यात येत आहे. लोकशाही मार्गाने अत्यंत शांततेत हे आंदोलन केले जाणार आहे. तरी तालुक्यातील जास्तीत जास्त समाज बांधवांनी या आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन सकल मराठा-बहुजन समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.


## सौ. संजीवनीताई रमेशअप्पा कराड यांच्याकडून रेणापूर येथे कातळे परिवाराचे सांत्वन



लातूर :- जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या प्रा. अर्चनाताई कातळे यांचे पिताश्री भाजपाचे ज्येष्ठ नेते रेणापूर सेवा सहकारी सोसायटीचे माजी चेअरमन तथा रेणापूर ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच अँड. रंगनाथरावजी कातळे यांचे नुकतेच दुःखद निधन झाल्याने भाजपाच्या सौ. संजीवनीताई रमेशआप्पा कराड यांनी सोमवारी रेणापूर येथील त्यांच्या निवासस्थानी जाऊन कातळे परिवाराचे सांत्वन केले.


लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या सोबत अनेक वर्ष काम केलेले भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते अँड. रंगनाथराव कातळे हे गेल्या काही दिवसापासून आजारी होते. गुरुवारी पहाटे त्यांचे दुःखद निधन झाले. सौ संजीवनीताई रमेशआप्पा कराड यांनी सोमवारी रेणापूर येथील त्यांच्या निवासस्थानी जाऊन कातळे परिवाराचे सांत्वन केले. यावेळी स्व. कातळे यांचे लहान बंधू रावसाहेब कातळे, मुली रंजना शेंडगे, संगीता कापसे, सिंधू गाडे, मंजुषा आपेट आणि अर्चना कातळे-टेंगसे, त्याचबरोबर पार्वतीताई सोमवंशी, चंद्रकांत कातळे यांच्यासह भाजपाचे दत्ता सरवदे, महेश गाडे, उतम चव्हाण, संतोष आपेट व इतर अनेक जण उपस्थित होते.

## पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांची धडक कार्यवाही, आवैध गौण खनिजाची चोरी करणार्या दोन जे.सि.बी. जप्त



केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील नांदुरघाट येथील तलावामध्ये संशयीतरित्या उत्खनन करणाऱ्या दोन जेसीबी पोलिसांनी केल्या जप्त दिनांक २७ जानेवारी२०२५ रोजीनांदुर घाट परिसरातील तलावामध्ये दोन जे.सी.बी.अवैधरित्या उत्खनन करीत असले बाबत माहिती पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांना मिळाली असता यांनी सदर घटनेची खात्री कारणे कमी पोलीस उपनिरीक्षक बनसोडे व पोलीस अंमलदार वाघमारे , भांगे यांना सदर ठिकाणी पाठवून सदर घटनेची खात्री केली असता नांदूरघाट परिसरातील पाझर तलावामध्ये दोन जे.सी.बी अवैधरित्या उत्खनन करत असताना मिळून आल्या सदर ठिकाणी त्यांच्याकडे कागदपत्राची मागणी केली असता कुठल्याही प्रकारचे उत्खनना संदर्भात तसेच जेसीबी संदर्भात वैध कागदपत्र सादर केले नाहीत व सदर ठिकाणाहून पळून जाण्याचा प्रयत्न केला. तरी पुढील कारवाई कामी दोन्ही जे.सी.बी पोलीस स्टेशन येथे जप्त करण्यात आल्या आहेत. दोन्ही जेसीबीची अंदाजे किंमत ३० लाख आहे. सदर जे सी.बी.वर मा. कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार केज यांना कळवले आहे व आर.टी.ओ. यांच्या कार्यालयात कारवाईसाठी अहवाल सादर करण्यात आला आहे.या अनुषगांने पोलीसच्या मागणी वरुन अंबाजोगाई येथील आ.टि.ओ यांनी सदर जे.सि.बी.चे कागदपत्र आपल्या कार्यालयास नसल्याचे नमुद करुन पोलीस स्टेशन केज यांना कळवले आहे.

## पोस्टचे खाते ठरले लाडक्या बहिणींसाठी वरदान, केवायसीचा त्रास नाही रांगेत उभे राहण्याचा झंझट



किनवट:शेख शौकत : किनवट तालुक्यातील लाडक्या बहिणींसाठी इतर बँकेच्या तुलनेत पोस्ट खाते ठरले वरदान केवायसी अन् आधार लिंक नसलेल्या, बँक खाते स्टॉप व बँक खात्याशी संबंधित अनेक अडचणी असलेल्या जवळपास हजारो महिलांनी बँकेशी संपर्क साधुन लाडकी बहीण योजनेचे अनुदान (डीबीटी) उचलण्यासाठी संघर्ष करत असताना कुणाची केवायसी नाही, तर कुणाच्या खात्याला आधार लिंक नाही, तर अनेक महिलांचे खाते नियमित न वापर झाल्यामुळे तात्पुरते बंद झालेले आहे या सर्व समस्याचा सामना करत असताना लाडक्या बहिणीची तारांबळ उडत असून इतर राष्ट्रीयकृत बँकेच्या तुलनेत पोस्ट खाते बँक महिलांना वरदान ठरत आहे. इतर राष्ट्रीयकृत बँकेची आधार लिंक व केवायसी प्रक्रिया अत्यंत क्लिष्ट असून राष्ट्रीयकृत बँकेसह सर्वच बँकेची उदासीनता दिसून येत आहे. याला अपवाद पोस्ट खाते बँक असून त्वरित खाते उघडून अनुदान मिळवण्यासाठी पोस्ट खाते बँक उपयोगी पडत असून पोस्ट खाते लाडक्या बहिणीसाठी वरदान म्हणले तर वावगे ठरणार नाही. राज्यात 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' सरकारने सुरू केली आहे. कमी कालावधीत ही योजना सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी शासनाने शर्थीचे प्रयत्न सुरू केले असताना त्यात अनंत अडचणींचा सामना करावा लागत आहे. योजनेचे पैसे काही महिलांच्या खात्यावर आले तर अनेक महिलांच्या खात्यावर अनुदानाची रक्कम येण्यास अडचणी येत आहेत.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा अर्ज भरलेल्या तालुक्यातील हजारो महिलांनी अद्यापही बँक खात्याला आधार न मोबाइल लिंक केले नसल्याची बाब समोर आली आहे. अशा महिलांच्या खात्यात रक्कम जमा होण्यासाठी अडचण निर्माण होणार आहे. बँक खात्याशी संबंधित अडचणी सोडविण्या साठी लाडक्या बहिणींना प्रशासनाने मदत कक्ष उभारून सहकार्य करावे अशी महिला वर्गाकडून अपेक्षा व्यक्त होत आहे.सर्व बँकातून अधिक महिला व लाडकी बहिणीचे खाते पोस्ट बँकमध्ये दिसून येत आहे.

# केज विकास संघर्ष समितीच्या आंदोलनाला यश मांजरा नदी पुलाच्या रस्त्याचे काम युद्ध पातळीवर सुरुः दोन महिन्यात काम पूर्ण होणार



केज/प्रतिनिधी गेली पाच वर्षापासून केज विकास संघर्ष समिती ज्या मांजरा पुलाच्या एक किमी रस्त्याच्या मजबुती व डांबरीकरणासाठी पाठपुरावा करत होती. हे काम आंदोलन करताच युद्धपातळीवर सुरू झाले असून येत्या दोन महिन्यात हे काम पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर रस्तारोको आंदोलन मागे घेण्यात आले. या आंदोलणार खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी मध्यस्थीकडून समितीला सहकार्य केले. खामगांव-पंढरपूर या महामार्गावर मांजरा नदी पूल व पुढे याच रस्त्यावर येरमाळा घाटाखाली असाच खराब रस्त्याचा पॅच मजबुती व डांबरीकरण करावे या मागणीसाठी केज विकास संघर्ष समिती गेली पाच वर्षे उपोषणे, धरणे आंदोलने आणि रास्तारोको सारखे अनेक आंदोलने केली होती. या रस्त्याची अवस्था खूपच वाईट झाल्याने अपघात, रात्रीच्या वेळी चोऱ्या व लूटमारीच्या सततच्या घटनांमुळे नागरिक व वाहनचालक त्रस्त झाले होते. यासाठी केज विकास संघर्ष समितीने २१ जानेवारी२०२५ रोजी सर्व संबंधित यंत्रणांना निवेदने देऊन २८ जानेवारी२०२५ रोजी सकाळी ११-०० वाजता मांजरानदी पुलावर बेमुदत आंदोलनाचा इशारा दिला होता. या आंदोलनाच्या प्रति समितीने एमएसआरडिसी, कळंब व केज चे तहसीलदार व पोलीस यंत्रणेला दिल्या होत्या. आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर महाराष्ट्र राज्य विकास महामंडळाने (एमएसआरडीसीने) तात्काळ रस्ता दुरुस्तीचे काम दिवस तात्काळ हाती घेतले.मात्र हे काम विहित मुदतीत व तरतुदीप्रमाणे पूर्ण करावे याचे लेखी आश्वासन घेण्यासाठी समितीने दिलेल्या वेळी आंदोलन सुरु केले. यावेळी बीड चे खासदार बजरंग बप्पा सोनवणे आंदोलनस्थळी पोहोंचले व त्यांनी संबंधित अधिकारी वेळेत पोहोंचले नसल्याबद्दल या विभागाला फोन करून चांगलेच धारेवर धरले. त्यांनी त्यांनी समितीने केलेल्या मागणीनुसार हे काम नियमानुसार व वेळेत पूर्ण करण्याच्या सूचनाही संबंधितांना दिल्या. सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात नासेर मुंडे, संपत वाघमारे, पत्रकार गौतम बचुटे, मुबशीर खतीब, तात्या गवळी यांच्यासह या परिसरातील वाहन चालक व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE